भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या आणि अर्भकाचे खाद्य (उत्पादन, पुरवठा आणि वितरण विनियमन) अधिनियम, १९९२

**(सन १९९२ चा अधिनियम क्रमांक ४१)**

[दिनांक १ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान]

# The Infant Milk Substitutes, Feeding Bottles and Infant Foods (Regulation of Production, Supply and Distribution) Act, 1992

**(Act No. 41 of 1992)**

**[As in force on the 1st December, 1999]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ५.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान असलेला दि इन्फन्ट मिल्क सब्स्टिटयूटस् फिडिंग बॉटल्स अॅण्ड इन्फन्ट फूडस् (रेग्युलेशन ऑफ प्रॉडक्शन, सप्लाय अॅण्ड डिस्ट्रीब्यूशन अॅक्ट, १९९२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ११, अंक १, दिनांक २२ जून, २००० यात पृष्ठ ३ ते १० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : २२ जून २०००.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Infant Milk Substitutes, Feeding Bottles and Infant Foods (Regulation of Production, Supply and Distribution) Act, 1992 as on the 1st December, 1999 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part-XII, Section-1, No. 1, Volume 11, dated 22nd June, 2000 on pages 3 to 10.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd June, 2000.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या आणि अर्भकाचे खाद्य (उत्पादन, पुरवठा आणि वितरण विनियमन) अधिनियम, १९९२

## कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या आणि अर्भकाचे खाद्य यासंबंधातील विवक्षित मनाई.

४. अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या यांच्या वापरास किंवा विक्रीस उत्तेजन देण्यास मनाई.

५. अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा त्यांच्याशी संबंधित सामग्री किंवा वस्तू दान करणे.

६. अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा अर्भकाचे खाद्य यांच्या पात्रांवरील किंवा खूणचिठ्ठ्यांवरील माहिती.

७. अर्भकाला द्यावयाच्या आहाराशी संबंधित शैक्षणिक व अन्य सामग्री यांमध्ये विवक्षित तपशीलाचा समावेश असणे

८. आरोग्य काळजी यंत्रणा.

९. अर्भकांना द्यावयाचे दूध-पर्यायी पदार्थ इत्यादी यांच्या वापरात वाढ करण्याकरिता आरोग्य कार्यकर्त्यास प्रलोभन दाखविणे.

१०. अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ इत्यादी यांचे उत्पादन, पुरवठा, वितरण किंवा विक्री करणाऱ्या कामगारांच्या संबंधातील विशेष उपबंध.

११. अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या किंवा खाद्य यांची मानके.

१२. प्रवेश करण्याची व झडती घेण्याची शक्ती.

१३. अर्भकाला द्यावयाचे दूध-पर्यायी पदार्थ इत्यादी किंवा त्यांची पात्रे यांचे अभिग्रहण करण्याची शक्ती.

१४. अधिहरण.

१५. अधिहरणाऐवजी खर्च चुकता करण्याचा पर्याय देण्याची शक्ती.

१६. अधिहरणामुळे अन्य शिक्षांमध्ये हस्तक्षेप न होणे.

१७. अभिनिर्णय.

१८. अभिग्रहण केलेला अर्भकासाठीचा दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाची बाटली किंवा अर्भकाचे खाद्य किंवा त्यांचे पात्र यांच्या मालकाला संधी देणे.

१९. अपील.

२०. शास्ती.

२१. अपराधांची दखल घेणे.

२२. कंपन्यांनी केलेले अपराध.

२३. दखलपात्र व जामीनपात्र अपराध.

२४. सद्भावनेने केलेल्या कारवाईस संरक्षण.

२५. १९५४ चा अधिनियम ३७ याच्या प्रयुक्तीस आडकाठी नसणे.

२६. नियम करण्याची शक्ती

# अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या आणि अर्भकाचे खाद्य (उत्पादन, पुरवठा आणि वितरण विनियमन) अधिनियम, १९९२

(१९९२ चा अधिनियम क्रमांक ४१)

(१ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान)

[२९ डिसेंबर, १९९२]

**स्तनपानास संरक्षण आणि उत्तेजन देण्याच्या दृष्टीने तसेच अर्भकाच्या खाद्याचा योग्य उपयोग होण्याची खातरजमा करण्याच्या दृष्टीने अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या आणि अर्भकाचे खाद्य यांचे उत्पादन, पुरवठा आणि वितरण यांचे विनियमन करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या त्रेचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, "अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या आणि अर्भकाचे खाद्य (उत्पादन, पुरवठा आणि वितरण विनियमन) अधिनियम, १९९२" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.

(३) तो, दिनांक १ सप्टेंबर, १९९३ रोजी व तेव्हापासून अंमलात येईल.

व्याख्या.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "जाहिरात" यात, कोणतीही सूचना, परिपत्रक, खूणचिठ्ठी, वेष्टन आणि अन्य दस्तऐवज यांचा समावेश आहे आणि त्यात प्रकाश, ध्वनी, धूर किंवा वायू यांच्या सहाय्याने करण्यात आलेल्या कोणत्याही दृश्य प्रतिरुपणाचा किंवा घोषणेचाही समावेश आहे;

(ख) "पात्र" याचा अर्थ, ज्यात अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य विक्रीसाठी किंवा वितरणासाठी ठेवण्यात किंवा आवेष्टित करण्यात येत असेल असा एखादा खोका, बाटली, करंडी, पत्र्याचा डबा, कॅन, पिंप, पेटी, नळी, भांडे, पोते, वेष्टन किंवा अन्य वस्तू, असा आहे;

(ग) "दुधाची बाटली" याचा अर्थ, अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ पाजण्यासाठी वापरण्यात येणारी कोणतीही बाटली किंवा भांडे, असा आहे, आणि त्यात अशा बाटलीला किंवा भांड्याला जोडलेली किंवा जोडता येणारी तोटी आणि झडप यांचा समावेश असेल;

(घ) "आरोग्य काळजी यंत्रणा" याचा अर्थ, माता, अर्भके किंवा गर्भवती स्त्रिया यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे गुंतलेली एखादी संस्था किंवा संघटना, असा आहे, आणि त्यात, खाजगी व्यवसाय करणाऱ्या आरोग्य कार्यकर्त्यांचा समावेश आहे, मात्र त्यात औषधनिर्माणशाळा किंवा औषधाची दुकाने यांचा समावेश असणार नाही;

(ङ) "आरोग्य कार्यकर्ता" याचा अर्थ, माता, अर्भके किंवा गर्भवती स्त्रिया यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात गुंतलेल्या व्यक्ती, असा आहे;

(च) "अर्भकाचे खाद्य" याचा अर्थ, अर्भक चार महिन्यांचे झाल्यानंतर त्याच्या पोषणविषयक वाढत्या गरजा भागवण्यासाठी मातेच्या दुधाला संपूरक म्हणून बाजारात विक्रीस आणलेले किंवा अन्य प्रकारे प्रदर्शित करण्यात आलेले कोणतेही खाद्य (मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो), असा आहे;

(छ) "अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ," याचा अर्थ, मातेच्या दुधाऐवजी अंशतः किंवा पूर्णतः वापरता येण्याजोगे म्हणून बाजारात विक्रीस आणलेले किंवा अन्यथा प्रदर्शित करण्यात आलेले कोणतेही खाद्य—मग ते असा वापर करण्यास योग्य असो किंवा नसो, असा आहे;

(ज) "खूणचिठ्ठी" याचा अर्थ, कोणत्याही पात्रावर लिखित, चिन्हांकित, मुद्रांकित, मुद्रित किंवा रेखाचित्रित स्वरुपात चिकटवण्यात आलेला किंवा दर्शविलेला कोणताही मजकूर, असा आहे;

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

(२) या अधिनियमातील अन्य एखाद्या अधिनियमितीच्या किंवा तिच्या कोणत्याही उपबंधाच्या निर्देशाचा, ज्या क्षेत्रात ती अधिनियमिती किंवा तो उपबंध अंमलात नसेल अशा क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्या क्षेत्रात अंमलात असलेल्या तत्सम कायद्याचा किंवा तत्सम कायद्याच्या संबंधित उपबंधाचा, कोणताही असल्यास, निर्देश आहे, असा लावण्यात येईल.

अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या आणि अर्भकाचे खाद्य यासंबंधातील विवक्षित मनाई.

३. कोणत्याही व्यक्तीला,—

(क) अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या यांचे वितरण, विक्री किंवा पुरवठा करण्यासाठी जाहिरात करता येणार नाही किंवा कोणतीही जाहिरात प्रकाशित करण्यात सहभागी होता येणार नाही; किंवा

(ख) अर्भकासाठी असलेल्या दूध-पर्यायी पदार्थामुळे होणारे पोषण हे मातेच्या दुधाशी समतुल्य असल्याचे किंवा त्यापेक्षा अधिक चांगले असल्याचे कोणत्याही प्रकारे भासवता येणार नाही किंवा तसा विश्वास निर्माण करता येणार नाही; किंवा

(ग) अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य यांच्या उपयोगास किंवा विक्रीस या अधिनियमाच्या उपबंधाच्या अनुसार असेल त्या व्यतिरिक्त अन्यथा, प्रोत्साहन देण्यात भाग घेता येणार नाही.

अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या यांच्या वापरास किंवा विक्रीस उत्तेजन देण्यास मनाई.

४. अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या यांचा उपयोग करण्यास किंवा विक्री करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता, कोणत्याही व्यक्तीला,—

(क) अर्भकासाठी असलेल्या दूध-पर्यायी पदार्थाचे व दुधाच्या बाटल्यांचे नमुने किंवा भांडी किंवा इतर वस्तूंच्या स्वरुपातील भेटवस्तू यांचा पुरवठा किंवा वितरण करता येणार नाही; किंवा

(ख) कोणत्याही गर्भवती स्त्रीशी किंवा अर्भकाच्या मातेशी संपर्क साधता येणार नाही; किंवा

(ग) अन्य कोणत्याही प्रकारची प्रलोभने दाखवता येणार नाहीत.

अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा त्यांच्याशी संबंधित सामग्री किंवा वस्तू दान करणे.

५. कलम ८, पोटकलम (४) याच्या उपबंधाच्या अधीनतेने, कोणत्याही व्यक्तीला,—

(क) अनाथालय सोडून अन्य कोणत्याही व्यक्तीला, अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थाची किंवा दुधाच्या बाटल्यांची;

(ख) अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या यांच्याशी संबंधित कोणत्याही माहितीपर किंवा शैक्षणिक सामग्रीचे किंवा साहित्याचे दान करता येणार नाही किंवा वितरण करता येणार नाही :

परंतु, या खंडामधील कोणतीही गोष्ट विहित, करण्यात येतील अशा शर्तींच्या किंवा निर्बंधाच्या अधीनतेने आरोग्य काळजी यंत्रणेमार्फत करण्यात येणाऱ्या सामग्रीच्या किंवा साहित्याच्या दानाला किंवा वितरणाला लागू असणार नाही.

अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा अर्भकाचे खाद्य यांच्या पात्रांवरील किंवा खुणचिठ्ठ्यांवरील माहिती.

६. (१) अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४ (१९५४ चा ३७) आणि त्याअन्वये करण्यात आलेले नियम याच्या उपबंधांना बाध न येता, कोणत्याही व्यक्तीस, अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थाचे किंवा अर्भकाच्या खाद्याचे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण हे, त्याच्या पात्रावर किंवा त्यावर चिकटवलेल्या कोणत्याही खुणचिठ्ठीवर स्पष्टपणे, ठळकपणे व सहजगत्या वाचता येईल आणि समजू शकेल अशा रीतीने मोठ्या अक्षरात "महत्त्वाची सूचना" असे शब्द, विहित करण्यात येईल अशा भाषेत दर्शवलेले असल्याखेरीज आणि त्याखाली, त्याच भाषेत पुढील तपशील दर्शविण्यात आल्याखेरीज, करता येणार नाही :—

(क) "तुमच्या बाळसाठी मातेचे दूध सर्वोत्तम आहे" असे मोठ्या अक्षरातील विधान,

(ख) अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा अर्भकांचे खाद्य यांचा उपयोग करण्याची आवश्यकता व त्याचा उपयोग करण्याची योग्य पद्धती याबाबत आरोग्य कार्यकर्त्याचा सल्ला घेऊनच त्याचा उपयोग करण्यात यावा, असे विधान,

(ग) अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा अर्भकाचे खाद्य हे, अर्भकाच्या पोषणाचे एकमात्र साधन नाही, अशी ताकीद,

(घ) असा पदार्थ योग्य रीतीने बनवण्यासंबंधीच्या सूचना आणि तो अयोग्य रीतीने बनवल्यास आरोग्यास हानिकारक आहे, अशी ताकीद,

(ङ) त्यात उपयोगात आणलेले घटक पदार्थ,

(च) घटक प्रमाणाचा निर्देश किंवा विश्लेषण,

(छ) त्याच्या साठवणीसाठी आवश्यक असणारी परिस्थिती,

(ज) त्याच्या निर्मितीचा बॅच क्रमांक, दिनांक, आणि देशाचे हवामान व तेथील साठवणी-संबंधीची परिस्थिती लक्षात घेऊन ज्या दिनांकापूर्वी त्याचा उपयोग केला जावा तो दिनांक,

(झ) विहित करण्यात येईल असा अन्य तपशील.

(२) अर्भकासाठी असलेल्या दूध-पर्यायी पदार्थाशी संबंधित पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही पात्रावर किंवा खूणचिठ्ठीवर,—

(क) अर्भकाचे किंवा स्त्रीचे किंवा दोहोंचे चित्र नसावे; किंवा

(ख) अर्भकासाठी असलेल्या दूध-पर्यायी पदार्थाच्या विक्रीमध्ये वाढ करण्यासाठी चित्रे किंवा अन्य चित्रित सामग्री किंवा वाक्प्रचार नसावेत; किंवा

(ग) त्यावर "मानववत्" किंवा "मातृवत्" किंवा यासारख्या अन्य शब्दांचा वापर केलेला नसावा ; किंवा

(घ) विहित करण्यात येईल असा अन्य तपशील त्यावर नसावा.

७. (१) प्रसवपूर्व किंवा प्रसवोत्तर घ्यावयाची काळजी किंवा अर्भकाला करावयाचे दुग्धपान याच्याशी संबंधित असलेले आणि गर्भवती स्त्रीला किंवा अर्भकाच्या मातेला जे मिळणे अभिप्रेत आहे असे, शैक्षणिक किंवा अन्य साहित्य—मग ते दृश्य असो किंवा श्राव्य असो—यांमध्ये,— अर्भकाला द्यावयाच्या आहाराशी संबंधित शैक्षणिक व अन्य सामग्री यांमध्ये विवक्षित तपशीलाचा समावेश असणे.

(क) "स्तनपानाचे फायदे व त्याची उत्तमता";

(ख) स्तनपान करण्याकरिता करावयाची तयारी व ते चालू ठेवणे;

(ग) अधूनमधून (अंशत:) बाटलीने दूध पाजण्यामुळे स्तनपानावर होणारे हानिकारक परिणाम ;

(घ) अर्भकाला दूध-पर्यायी पदार्थ देऊ लागल्यावर काही कालावधीनंतर त्याला पुन्हा स्तनपान करतेवेळी येणाऱ्या अडचणी ;

(ङ) अर्भकासाठी असलेले दूध-पर्यायी पदार्थ व दुधाच्या बाटल्या यांच्या उपयोगामुळे पडणारा आर्थिकभार व त्याचे सामाजिक परिणाम;

(च) अर्भकासाठी असलेले दूध-पर्यायी पदार्थ व दुधाच्या बाटल्या यांच्या चुकीच्या उपयोगामुळे आरोग्याला संभवणारे धोके ;

(छ) विहित करण्यात येतील अशा अन्य बाबी,

याविषयीच्या स्पष्ट तपशीलाचा समावेश असेल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही साहित्याचा उपयोग अर्भकासाठी असणारे दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या यांच्या उपयोगात किंवा विक्रीत वाढ होण्याकरिता करता येणार नाही.

८. (१) कोणत्याही व्यक्तीस, अर्भकासाठी असणारे दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य यांचा उपयोग किंवा विक्री यात वाढ करण्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या कोणत्याही साहित्याच्या संबंधातील किंवा त्या साहित्याच्या वितरणाकरिता असलेले फलक किंवा भित्तिचित्रे प्रदर्शित करण्यासाठी कोणत्याही आरोग्य काळजी यंत्रणेचा उपयोग करता येणार नाही : आरोग्य काळजी यंत्रणा.

परंतु, या पोटकलमाचे उपबंध पुढील गोष्टींना लागू होणार नाहीत—

(क) कलम ५, खंड (ख) याच्या परंतुकानुसार माहितीपर व शैक्षणिक स्वरूपाची सामग्री किंवा साहित्य दान म्हणून देणे किंवा त्याचे वितरण करणे ; आणि

(ख) आरोग्य कार्यकर्त्याला, कलम ७, पोटकलम (१) यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या माहिती बरोबरच, अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकांचे खाद्य यांच्या उपयोगाशी संबंधित अशा शास्त्रीय व वस्तुस्थितिस्वरूप बाबींची माहिती प्रसारित करणे.

(२) अर्भकासाठीचे दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य यांचे उत्पादन, पुरवठा, वितरण किंवा विक्री करणारी कोणतीही व्यक्ती, असे पदार्थ, बाटल्या, किंवा खाद्य यांच्या उपयोगात किंवा विक्रीत वाढ होण्याच्या प्रयोजनार्थ आरोग्य काळजी यंत्रणेचे काम करणाऱ्या कोणत्याही आरोग्य कार्यकर्त्यास, कोणतीही रक्कम देणार नाही.

(३) आरोग्य कार्यकर्त्याहून अन्य कोणतीही व्यक्ती, अर्भकाच्या मातेस किंवा तिच्या कुटुंबातील अन्य कोणत्याही व्यक्तीस, अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा अर्भकाचे खाद्य यांचे प्रात्यक्षिक दाखविणार नाही आणि असा आरोग्य कार्यकर्ता अशा अर्भकाच्या मातेस किंवा अशा अन्य व्यक्तीस, अर्भकाला द्यावयाचे दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाच्या खाद्याच्या चुकीच्या उपयोगामुळे संभवणारे धोकेही स्पष्टपणे समजावून सांगेल.

(४) माता, अर्भक किंवा गर्भवती स्त्रिया यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम करणारी कोणतीही संस्था किंवा संघटना याहून अन्य कोणतीही व्यक्ती, ज्या माता स्तनपान देऊ शकत नसतील किंवा ज्यांना अर्भकासाठी असलेले दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या विकत घेणे परवडणारे नसेल अशा मातांना अर्भकासाठी असलेल्या दूध-पर्यायी पदार्थांचे किंवा दुधाच्या बाटल्यांचे वितरण करणार नाही.

(५) कोणत्याही अनाथालयाला, अर्भकांना द्यावयाचे दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या यांचा उक्त अनाथालयात उपयोग करण्याकरिता, त्यांच्या विक्रीच्या किमतीहून कमी किमतीस त्या विकत घेता येतील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ अशी खरेदी ही अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या यांच्या उपयोगामध्ये किंवा त्यांच्या विक्रीमध्ये वाढ होण्याकरिता दाखविलेले प्रलोभन आहे, असे मानले जाणार नाही.

अर्भकांना द्यावयाचे दूध-पर्यायी पदार्थ इ. यांच्या वापरात वाढ करण्याकरिता आरोग्य कार्यकर्त्यास प्रलोभन दाखविणे.

९. (१) अर्भकाला द्यावयाचे दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकांचे खाद्य यांचे उत्पादन, पुरवठा, वितरण किंवा विक्री करणारी कोणतीही व्यक्ती, अशा पदार्थांच्या किंवा बाटल्यांच्या किंवा खाद्याच्या उपयोगात वाढ होण्यासाठी, आरोग्य कार्यकर्त्याला किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, कोणतेही आर्थिक प्रलोभन किंवा भेटवस्तू देऊ करणार नाही किंवा देणार नाही.

(२) जेव्हा अशी कोणतीही व्यक्ती, आरोग्य कार्यकर्त्यास, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, कोणतेही अंशदान देईल किंवा त्याच्यावर कसलाही खर्च करील तेव्हा, अशी व्यक्ती किंवा आरोग्य कार्यकर्ता, तो ज्या संस्थेशी किंवा संघटनेशी संलग्न असेल तिच्याकडे तसे केल्याचे उघड करील.

अर्भकांसाठी दूध-पर्यायी पदार्थ इ. यांचे उत्पादन, पुरवठा, वितरण किंवा विक्री करणाऱ्या कामगारांच्या संबंधातील विशेष उपबंध.

१०. (१) अर्भकाला द्यावयाचे दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य यांचे उत्पादन, पुरवठा, वितरण किंवा विक्री करणारी व्यक्ती, तिच्या कामगारांनी केलेल्या अशा पदार्थांच्या किंवा बाटल्यांच्या किंवा खाद्यांच्या विक्रीच्या प्रमाणानुसार त्यांचे पारिश्रमिक निश्चित करणार नाही किंवा त्यांना कमिशन देणार नाही.

(२) अशा व्यक्तीचे कामगार एखाद्या गर्भवती स्त्रीला किंवा अर्भकाच्या मातेला अर्भकाची प्रसवपूर्व किंवा प्रसवोत्तर घ्यावयाची काळजी यासंबंधात शिक्षण देण्यासंबंधातील कोणतेही काम करणार नाही.

अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, दुधाच्या बाटल्या किंवा खाद्य यांची मानके.

११. (१) कोणतीही व्यक्ती, अर्भकाला द्यावयाचा कोणताही दूध-पर्यायी पदार्थ किंवा अर्भकाचे खाद्य हे, अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ (१९५४ चा ३७) आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमाअन्वये, असे पदार्थ किंवा खाद्य यांसाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मानकांशी अनुरूप नसेल तर आणि त्याच्या पात्रावर भारतीय मानक केंद्र अधिनियम, १९८६ (१९८६ चा ६३) याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या भारतीय मानक केंद्राद्वारे विनिर्दिष्ट केलेले व अर्भकाला द्यावयाचा दूध-पर्यायी पदार्थ किंवा अर्भकाचे खाद्य अशा मानकांशी अनुरूप असल्याचे दर्शविणारे संबंधित प्रमाणचिन्ह नसेल तर, त्यांची विक्री किंवा अन्यथा वितरण करणार नाही :

परंतु, अर्भकाला द्यावयाचा दूध-पर्यायी पदार्थ किंवा अर्भकाचे खाद्य याकरिता, अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ (१९५४ चा ३७) याअन्वये कोणतीही मानके विनिर्दिष्ट करण्यात आली नसतील त्याबाबतीत, कोणतीही व्यक्ती, असा पदार्थ किंवा खाद्य व त्याच्या पात्रावर चिकटवण्यात आलेली खूण-चिठ्ठी या संबंधात या अधिनियमाअन्वये करण्यात आलेल्या नियमाअन्वये केंद्र सरकारची मंजुरी मिळवल्या-खेरीज अशा पदार्थांची किंवा खाद्याची विक्री किंवा अन्यथा वितरण करणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, कोणतीही दुधाची बाटली, जर ती पोटकलम (१) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे भारतीय मानक केंद्राद्वारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मानकचिन्हांशी अनुरूप नसेल आणि तिच्या पात्रावर तसे चिन्ह चिकटवण्यात आले नसेल तर, विकणार नाही किंवा अन्यथा तिचे वितरण करणार नाही.

प्रवेश करण्याची व झडती घेण्याची शक्ती.

१२. (१) अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ (१९५४ चा ३७) याच्या कलम ९ खाली नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही अन्न निरीक्षकास (यात यापुढे ज्याचा निर्देश अन्न निरीक्षक म्हणून केलेला आहे) किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेला पहिल्या दर्जाहून खालच्या दर्जाचा नसणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास (यात यापुढे ज्याचा निर्देश प्राधिकृत अधिकारी म्हणून केलेला आहे) कलम ६ किंवा कलम ११ याच्या कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण झाले आहे किंवा होत आहे असे सकारण वाटत असेल तर, त्याला अर्भकासाठी असलेले दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य यांचा व्यापार किंवा वाणिज्य जेथे चालत असेल किंवा असे पदार्थ, बाटल्या, किंवा खाद्य यांचे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण केले जात असेल अशा कोणत्याही कारखान्यात, इमारतीत, धंद्याच्या जागेत किंवा अन्य कोणत्याही जागेत, वाजवी वेळेत प्रवेश करता येईल आणि झडती घेता येईल.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे झडत्या व अभिग्रहणासंबंधीचे उपबंध शक्य असतील तेथवर, या अधिनियमाअन्वये करण्यात आलेल्या प्रत्येक झडतीस व अभिग्रहणास लागू असतील.

१३. (१) कोणत्याही अन्न निरीक्षकास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास अर्भकाला द्यावयाचे कोणतेही दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य किंवा त्याचे पात्र यांच्याबाबतीत या अधिनियमाच्या उपबंधांचे व्यतिक्रमण करण्यात आले आहे किंवा येत आहे, असे सकारण वाटत असेल तर तो, असे पदार्थ किंवा बाटल्या किंवा खाद्य किंवा पात्र यांचे अभिग्रहण करू शकेल.

(२) कोणत्याही अन्न निरीक्षकास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास दूध-पर्यायी पदार्थ किंवा खाद्य किंवा बाटली किंवा पात्र; त्याचे अभिग्रहण केल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत, ज्या जिल्हा न्यायाधीशाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत असे अभिग्रहण करण्यात आले असेल त्याची अशा वस्तू ठेवून घेण्यास मान्यता मिळाल्याखेरीज ठेवून घेता येणार नाही.

अर्भकाला द्यावयाचे दूध-पर्यायी पदार्थ इत्यादी किंवा त्यांची पात्रे यांचे अभिग्रहण करण्याची शक्ती.

१४. अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य किंवा त्याचे पात्र यांच्या बाबतीत, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करण्यात आले असेल किंवा केले जात असेल तर ते अधिहरणयोग्य असेल :

अधिहरण.

परंतु, अधिहरणाचा अभिनिर्णय देताना, ज्या व्यक्तीच्या ताब्यात, अधिकारितेत किंवा नियंत्रणात असा कोणताही दूध-पर्यायी पदार्थ, किंवा बाटली किंवा खाद्य किंवा पात्र असल्याचे आढळले असेल, तिने या अधिनियमाच्या उपबंधांचे व्यतिक्रमण केलेले नाही, असे न्यायालयाची खात्री पटून सिद्ध झाले तर, न्यायालयाला, या अधिनियमाद्वारे असा दूध-पर्यायी पदार्थ किंवा बाटली किंवा खाद्य किंवा पात्र यांचे अधिहरण करण्याचा अभिनिर्णय देण्याऐवजी, ज्या व्यक्तीने या अधिनियमाच्या उपबंधांचे व्यतिक्रमण केले असेल अशा व्यक्तीविरूद्ध, त्याला योग्य वाटेल असा अन्य आदेश काढता येईल.

१५. (१) या अधिनियमाद्वारे जेव्हा जेव्हा कोणतेही अधिहरण प्राधिकृत केले जाईल तेव्हा अधिहरणाचा अभिनिर्णय देणारे न्यायालय, अधिहरणाच्या अभिनिर्णयाच्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, त्याच्या मालकास असा पर्याय देवू शकेल की, त्याने अधिहरणाऐवजी ज्याच्या बाबतीतील अधिहरण प्राधिकृत केलेले आहे असा अर्भकासाठी दूध-पर्यायी पदार्थ, किंवा दुधाची बाटली किंवा अर्भकाचे खाद्य किंवा त्याचे पात्र याच्या किंमतीपेक्षा अधिक असणार नाही इतका, न्यायालयाला योग्य वाटेल एवढा खर्च चुकता करावा.

अधिहरणाऐवजी खर्च चुकता करण्याचा पर्याय देण्याची शक्ती.

(२) न्यायालयाने आदेश दिलेला खर्च चुकता केल्यावर अभिग्रहण केलेला, अर्भकासाठी असलेला दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाच्या बाटल्या किंवा अर्भकाचे खाद्य किंवा त्याचे पात्र याचे ज्या व्यक्तीकडून अभिग्रहण करण्यात आले होते ती व्यक्ती, अशा पदार्थाचे किंवा बाटलीचे किंवा खाद्याचे किंवा पात्रांचे कोणतेही वितरण, विक्री किंवा पुरवठा करण्यापूर्वी, या अधिनियमांच्या उपबंधांची अंमलबजावणी करील अशा शर्तीवर तिला ते परत करण्यात येईल.

१६. या अधिनियमाखाली केलेले कोणतेही अधिहरण किंवा चुकता करावयाचा आदेश देण्यात आलेला खर्च यामुळे, या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा अन्य कोणत्याही कायद्यान्वये, ज्या कोणत्याही शिक्षेस बाधित झालेली व्यक्ती पात्र ठरत असेल ती शिक्षा, तिच्यावर लादण्यास प्रतिबंध होणार नाही.

अधिहरणामुळे अन्य शिक्षांमध्ये हस्तक्षेप न होणे.

१७. कोणतेही अधिहरण करावयाचा अभिनिर्णय किंवा खर्च चुकता करावयाचा आदेश,—

अभिनिर्णय.

(क) ज्या प्रमुख दिवाणी न्यायालयाच्या स्थानिक सीमांच्या आत असे अधिहरण करण्यात आले आहे, किंवा, यथास्थिति, खर्च चुकता करण्याचा आदेश देण्यात आला आहे, त्या मूळ अधिकारिता असणाऱ्या प्रमुख दिवाणी न्यायालयाकडून, कोणतीही मर्यादा न घालता,

(ख) केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत प्राधिकृत करील त्याप्रमाणे पाच हजार रुपयांहून अधिक आर्थिक अधिकारिता असणाऱ्या दिवाणी न्यायालयाहून खालच्या दर्जाचे नसेल अशा अन्य न्यायालयाकडून केंद्र सरकार याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा मर्यादांच्या अधीनतेने,

—दिला जाईल.

अभिग्रहण केलेला किंवा त्याचे पात्र याच्या मालकाला, अर्भका- साठीचा दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाची बाटली किंवा अर्भकाचे खाद्य किंवा त्याचे पात्र यांच्या मालकाला संधी देणे.

१८. (१) अर्भकाला खावयाचा दूध-पर्यायी पदार्थ, किंवा दुधाची बाटली किंवा अर्भकाचे खाद्य किंवा त्याचे पात्र याच्या मालकाला, असा पदार्थ किंवा बाटली किंवा खाद्य किंवा पात्र याचे अधिहरण ज्या कारणांवरून करण्यात येईल ती कारणे कळवणारी, आणि नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी वेळेच्या आत, त्याला अधिहरण करण्याविरुद्ध लेखी प्रतिवेदन करण्याची वाजवी संधी देणारी आणि याबाबतीत त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची इच्छा असल्यास तशी संधी देणारी लेखी नोटीस दिल्याशिवाय, अधिहरणाचा अभिनिर्णय देण्याबाबतचा किंवा खर्च चुकता करण्याबाबतचा कोणताही आदेश देण्यात येणार नाही :

परंतु, जर अशी नोटीस, अर्भकाला खावयाचा दूध-पर्यायी पदार्थ किंवा दुधाची बाटली किंवा अर्भकाचे खाद्य किंवा त्याचे पात्र याचे अभिग्रहण करण्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत देण्यात आली नसेल त्याबाबतीत, तो कालावधी समाप्त झाल्यानंतर, ज्या व्यक्तीच्या ताब्यातून असा दूध-पर्यायी पदार्थ किंवा बाटली किंवा खाद्य किंवा पात्र यांचे अभिग्रहण करण्यात आले होते तिला ते परत करण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) याचे उपबंध, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या प्रत्येक कार्यवाहीला शक्य होईल तितपत लागू होतील.

अपील.

१९. (१) अधिहरणाचा अभिनिर्णय देणाऱ्या किंवा खर्च चुकता करण्याचा आदेश देणाऱ्या न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयामुळे व्यथित असेल अशी कोणतीही व्यक्ती, अशा न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध ज्याच्याकडे अपील दाखल करता येते त्या न्यायालयाकडे अपील करू शकेल.

(२) अपील न्यायालय, अपीलकाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, ज्याच्याविरुद्ध अपील करण्यात आले आहे असा निर्णय किंवा आदेश कायम करण्याचा, त्यात फेरबदल किंवा सुधारणा करण्याचा त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल किंवा आवश्यक असल्यास अधिक साक्षीपुरावे घेतल्यानंतर, नवीन निर्णय किंवा अभिनिर्णय यांकरिता त्यास योग्य वाटेल अशा निदेशांसहित प्रकरण परत पाठवू शकेल :

परंतु, अपीलकाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज किंवा आपला बचाव करण्याची त्याची इच्छा असल्यास, तशी संधी दिल्याखेरीज, या कलमाअन्वये अधिहरणाऐवजी कोणत्याही दंडात वाढ करणारा किंवा जास्त किंमतीच्या मालाचे अधिहरण करणारा आदेश देता येणार नाही.

(३) पोटकलम (२) खालील न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध आणखी अपील करण्यात येणार नाही.

शास्ती.

२०. (१) जी कोणतीही व्यक्ती, कलम ३, ४, ५, ७, ८, ९, १० किंवा कलम ११ चे पोटकलम (२) यांच्या उपबंधांचे व्यतिक्रमण करील ती, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा दंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) जी कोणतीही व्यक्ती, कलम ६ किंवा कलम ११ चे पोटकलम (१) यांच्या उपबंधांचे व्यतिक्रमण करील ती, सहा महिन्यांहून कमी नसेल परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि दोन हजार रुपयांहून कमी नसेल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र असेल :

परंतु, न्यायालय न्यायनिर्णयात कोणतीही समुचित व विशेष कारणे नमूद करून तीन महिन्यांहून कमी नसेल परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि एक हजार रुपयांहून कमी असणार नाही अशा दंडाची शिक्षा देऊ शकेल.

अपराधांची दखल घेणे.

२१. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १७३ मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाची—

(क) अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ (१९५४ चा ३७), कलम २०, पोटकलम (१) अन्वये या बाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती; किंवा

(ख) शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत प्राधिकृत केलेला वर्ग-एक च्या दर्जाहून खालच्या दर्जाचा नसणारा एखादा अधिकारी; किंवा

(ग) शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत प्राधिकृत करील अशा बालकल्याण व विकास आणि बालपोषण या क्षेत्रात गुंतलेल्या स्वेच्छा संघटनेचा प्रतिनिधी,

—याने कोणतीही लेखी तक्रार केल्याखेरीज, दखल घेणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या खंड (ग) खाली प्राधिकृत केलेल्या स्वेच्छा संघटनेच्या प्रतिनिधीने तक्रार केली असेल आणि न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), कलम २०४, पोटकलम (१) अन्वये समन्स किंवा, यथास्थिति, वॉरंट बजावले असेल त्याबाबतीत त्या न्यायालयाचा सहायक सरकारी अभियोक्ता ते प्रकरण स्वतःकडे घेईल व खटला चालवील.

२२. (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तर, तो अपराध घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालवण्याबद्दल कंपनीची प्रभारी म्हणून असलेली आणि कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनीही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास पात्र ठरेल : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, कोणत्याही शिक्षेस पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये यासाठी तिने सर्व वाजवी खबरदारी घेतली होती असे शाबीत केल्यास, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि तो, कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हयगयीमुळे घडला असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारीसुद्धा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र ठरेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क्) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यात एखादी पेढी किंवा अन्य व्यक्तींचा अधिसंघ अंतर्भूत आहे, आणि

(ख्) पेढीच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

२३. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध हा,— दखलपात्र व जामीनपात्र अपराध.

(क्) जामीनपात्र ;

(ख्) दखलपात्र ;

— असेल.

२४. या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टी-बद्दल, केंद्र सरकार किंवा राज्य शासन, किंवा केंद्र सरकार किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य विधिविषयक कार्यवाही केली जाणार नाही. सद्भावनेने केलेल्या कारवाईस संरक्षण.

२५. या अधिनियमाचे उपबंध किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम हे, अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ किंवा त्याअन्वये केलेले नियम यांच्या जोडीला आणखी असतील आणि त्यांना न्यूनकारी असणार नाहीत. १९५४ चा अधिनियम ३७ याच्या प्रयुक्तीस आडकाठी नसणे.

२६. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याकरिता, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा :—

(क्) ज्या शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने, कलम ५, खंड (ख्) याच्या परंतुकाअन्वये शैक्षणिक साधनसामग्री व साहित्य दान करता किंवा वितरित करता येईल त्या शर्ती व निर्बंध ;

(ख्) कलम ६, पोटकलम (१) अन्वये ज्या भाषेत, नोटीस व अन्य तपशील प्रदर्शित करता येईल ती भाषा ;

(ग्) कलम ६, पोटकलम (१), खंड (ड्) अन्वये जो प्रदर्शित करावयाचा असेल तो तपशील ;

(घ्) कलम ६, पोटकलम (२), खंड (घ्) अन्वये एखाद्या पात्रावर किंवा खूणचिठ्ठीवर लावावयाचा नसेल असा तपशील ;

(ङ्) कलम ७, पोटकलम (१) खंड (ज्) या अन्वये गर्भवती स्त्रिया किंवा अर्भकांच्या माता यांच्यापर्यंत पोचवावयाच्या माहितीमध्ये अंतर्भूत करावयाच्या बाबी ;

(च्) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रुपातच परिणामक होईल किंवा यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शुन्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई